# आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७

## फक्त महत्वाच्या तरतुदी

**उपरोक्त अधिनियमाच्या अनुषंगाने:-**

**कलम १: व्याप्ती**
**कलम १(२):** सदर अधिनियम जम्मू व काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतास तसेच भारताबाहेर राहणाऱ्या भारतीय नागरिकांनासुध्दा लागू असेल.

**कलम २: व्याख्या**
**कलम २(क):** "मुले" या संज्ञेत पुत्र, कन्या, नातू व नात यांचा समावेश होतो. यात अज्ञान व्यक्तीचा समावेश होत नाही.

**कलम २(ख):** "निर्वाह" या संज्ञेत अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय शुश्रुषा (देखभाल) व उपचार यांचा समावेश होतो.

**कलम २(घ):** "आई-वडिल" या संज्ञेत जन्म देणारे माता व पिता, दत्तक माता व पिता, सावत्र माता व पिता यांचा समावेश होतो, मग ते ज्येष्ठ नागरिक असो किंवा नसो.

**कलम २(च):** "मालमत्ता" या संज्ञेत हक्क किंवा हितसंबंध असलेल्या जंगम, स्थावर, वारसाप्राप्त, स्वकष्टार्जित, मूर्त, अमूर्त अशा सर्व मालमत्तेचा समावेश होतो.

**कलम २(छ):** "नातेवाईक " या संज्ञेत सज्ञान असलेला आणि "आई-वडिल" अथवा ज्येष्ठ नागरिकाच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता ज्याच्या ताब्यात येईल किंवा ज्याला कायदेशीर वारसाहक्क मिळेल अशा व्यक्तीचा समावेश होतो.

**कलम २(ज ):** "ज्येष्ठ नागरिक" या संज्ञेत वय वर्षे साठ पुर्ण केलेल्या अथवा त्यापेक्षा अधिक वयाच्या आणि भारतीय नागरिक असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो.

**कलम २(ट ):** "कल्याण" या संज्ञेत अन्न, आरोग्याची काळजी, मनोरंजन केंद्र यांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या इतर सुविधांसाठी केलेली तरतूद यांचा समावेश होतो.

इतर कोणत्याही अधिनियमांमध्ये या अधिनियमाशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट असली तरीही या अधिनियमाच्या तरतूदी अंमलात असतील.

**कलम ४: आई-वडिलांच्या व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह**
**कलम ४(१):** स्वतःच्या उत्पन्नातून किंवा स्वतःच्या मालकीच्या मालमत्तेतून स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आई-वडिलांसह ज्येष्ठ नागरिकः
(एक) आई-वडिलांच्या किंवा आजी-आजोबांच्या बाबतीत अज्ञान नसणाऱ्या त्यांच्या एका किंवा अधिक मुलांविरुध्द,
(दोन) निपुत्रिक ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत कलम २(छ) अन्वये "नातेवाईक" या संज्ञेत बसणाऱ्या विरुध्द निर्वाह प्राप्त करण्यासाठी या अधिनियमातील कलम ५ अन्वये अर्ज करण्यास हक्कदार असतील.

आई-वडिल आणि ज्येष्ठ नागरिक यांना सर्वसामान्य जीवन जगता यावे या दृष्टीने, त्यांच्या गरजांच्या मर्यादेत, त्यांचा निर्वाह चालविणे हे मुलांचे/नातेवाईकांचे दायित्व आहे. (ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत कलम २(छ) अन्वये "नातेवाईक" असणाऱ्याच्या ताब्यात अशा ज्येष्ठ नागरिकाची मालमत्ता असावी किंवा अशी मालमत्ता या ज्येष्ठ नागरिकाकडून वारसाहक्काने त्याला मिळणारी असावी. कलम २(छ) अन्वये एकापेक्षा अधिक "नातेवाईक" असतील तर वारसाहक्काने मिळणाऱ्या मालमत्तेच्या प्रमाणात ते निर्वाह खर्च प्रदान करतील.)

**कलम ५: निर्वाहासाठी अर्ज**
**कलम ५ (१) (क)** : अन्वये आई-वडिल अथवा ज्येष्ठ नागरिक निर्वाहासाठी अर्ज करु शकतील;

**कलम ५ (१) (ख):** अन्वये आई-वडिल अथवा ज्येष्ठ नागरिक निर्वाहासाठी अर्ज करण्यास असमर्थ असतील तर त्यांच्यातर्फे प्राधिकृत केली व्यक्ती किंवा संघटना अर्ज करु शकेल. (संघटना म्हणजे नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अथवा त्यावेळच्या अन्य कायद्यान्वये नोंदणी केलेली स्वयंसेवी संघटना)

**कलम ५ (१) (ग):** अन्वये या अधिनियमान्वये नेमलेले न्यायाधिकरण स्वाधिकारात दखल घेऊ शकेल.

**कलम ५ (२):** अन्वये मासिक निर्वाह भत्त्याशी संबंधित कार्यवाही प्रलंबित असतांना न्यायाधिकरण आई-वडिल अथवा ज्येष्ठ नागरिकांना मासिक अंतरिम निर्वाह भत्ता देण्याबाबत मुलांना/नातेवाईकांना निदेश देऊ शकेल.

**कलम ५ (३):** अन्वये, कलम ५ (१) नुसार मासिक निर्वाह भत्ता मागणी अर्ज "अ" नमुन्यात प्राप्त झाल्यानंतर न्यायाधिकरण अर्जाची (क) अर्ज पूर्ण भरला आहे (ख) अर्जदाराच्याबाबत विरुध्द पक्षाची खरोखरच बांधीलकी आहे काय याबाबत छाननी करेल व त्रुटींची पूर्तता करुन घेऊन मुलांना/नातेवाईकांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकामी तसेच मासिक निर्वाह भत्त्याची रक्कम निर्धारित करण्याकामी "क" नमुन्यात नोटीस/आदेशिका बजावेल.

**कलम ५ (४):** कलम ५ (१) नुसार मासिक निर्वाह भत्ता मागणी अर्ज, नोटीस बजावल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये, लेखी कारणे नमूद करुन हा अवधी कमाल तीस दिवस पुढे वाढविता येईल.

**कलम ५ (५):** कलम ५ (१) नुसार मासिक निर्वाह भत्ता मागणी अर्ज एक किंवा अधिक व्यक्तींविरुध्द दाखल करता येईल. अर्जाची पोहोच नमुन्यात देण्यात येईल. व अर्जाची नोंद "ब" नमुन्यात ठेवण्यात येईल.

**कलम ५ (७):** निर्वाह भत्ता किंवा कार्यवाहीचा खर्च देण्याचा आदेश, आदेशाच्या दिनांकापासून अथवा आदेशात तसे स्पष्ट नमुद केले असेल तर अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून प्रदेय असेल.

**कलम ५ (८):** न्यायाधिकरणाच्या या आदेशाचे पर्याप्त कारणांशिवाय पालन न झाल्यास, न्यायाधिकरणाला मुलांच्या अथवा नातेवाईकांच्या विरूध्द वॉरंट काढता येईल किंवा दंडासह रक्कम वसूल करता येईल किंवा एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीसाठी किंवा रक्कम प्रदान करण्यात येईपर्यंत किंवा यापैकी जे आधी घडेल तितक्या कालावधीसाठी कारावासाची शिक्षा देता येईल.
परंतू असे वॉरंट काढण्यासाठी, ज्या तारखेस रक्कम देय झाली होती त्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीत अशा देय रकमेची वसूली करण्यासाठी न्यायाधिकरणाकडे तसा अर्ज करणे आवश्यक असेल.

**कलम ६: अधिकारिता व कार्यपध्दती**

**कलम ६ (१):** कलम ५ (१) नुसार मासिक निर्वाह भत्ता मागणी अर्ज (अ) जेथे मुले किंवा नातेवाईक राहत आहेत अथवा शेवटी राहत होते; (ब) निर्वाहाची मागणी ज्या व्यक्तीने केली आहे अशी व्यक्ती जेथे राहते त्या ठिकाणच्या न्यायाधिकरणाकडे दाखल करता येईल.

**कलम ६ (२):** कलम ५ नुसार मासिक निर्वाह भत्ता मागणी अर्ज ज्या मुलांविरुध्द अथवा नातेवाईकाविरूध्द दाखल केला आहे त्यांना उपस्थित होण्यासाठी न्यायाधिकरण "क" नमुन्यात नोटीस/आदेशिका काढील.

**कलम ६ (३): कलम ६ (४):** उपस्थित राहणे भाग पाडण्यासाठी न्यायाधिकरणास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ नुसार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यास असलेले अधिकार असतील.

**कलम ६ (४):** या कार्यवाहीतील सर्व साक्षीपुरावे, जबाब, समन्स विहित केलेल्या पध्दतीने नोंदविण्यात येतील. तसेच नोटीस बजावूनही मुले, नातेवाईक हजर राहण्याचे जाणीवपूर्वक टाळत असतील तर प्रकरणाचा एकतर्फी निकाल देण्यात येईल.

**कलम ६ (५):** भारताबाहेर राहणाऱ्या मुलांच्या/नातेवाईकांच्या बाबतीत केंद्र सरकार शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करेल त्यानुसार समन्स बजावले जाईल.

**कलम ६ (६):** कलम ५ अन्वये दाखल अर्जाची सुनावणी करण्यापूर्वी, न्यायाधिकरण असा अर्ज, उभय पक्षांत समझोता घडून येतो अथवा नाही याची पडताळणी करण्यासाठी "समेट अधिकारी" यांच्याकडे "ड " नमुन्यात निर्दिष्ट करेल. (या अधिनियमान्वये नमूद संघटनेला अथवा या अधिनियमातील कलम १८(१) अन्वये राज्य शासनाने पदनियुक्त केलेले "निर्वाह अधिकारी" अथवा न्यायाधिकरणाने नामनिर्देशित केलेली अन्य व्यक्ती "समेट अधिकारी" म्हणून नेमली जाते.) "समेट अधिकारी" एका महिन्याच्या आत उभय पक्षांत समझोता घडून येतो अथवा नाही याबाबत अहवाल "प" नमुन्यात न्यायाधिकरणास सादर करेल. जर दोन्ही पक्षात समझोता झाला तर तो नमुना "इ" मध्ये करण्यात येईल.
हा समझोता नमुना "फ" मध्ये न्यायाधिकरणासमोर कायम करण्यात येईल.
प्रत्येक न्यायाधिकरण या कलमान्वये "समेट अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यास पात्र असलेल्या व्यक्तींची एक यादी तयार करेल. कलम १८ मध्ये नमूद निर्वाह अधिकारी म्हणून पद निर्देशित केलेल्या अधिकाऱ्याखेरीज खालील अटी व शर्तींच्या आधारे "समेट अधिकारी" यांची नियुक्ती करता येईल.
अ) तो ज्येष्ठ नागरिक किंवा दूर्बल घटक कल्याणासाठी किंवा शिक्षण किंवा आरोग्य किंवा दारिद्र निमूर्लन किंवा महिला सक्षमीकरण किंवा सामाजिक न्याय किंवा ग्राम विकास किंवा तत्संबंधीत क्षेत्रात कार्यरत संघटनेचा किमान दोन वर्षापासून, सेवाभिलेख निर्दोष असलेला सदस्य असावा.

ब) तो संघटनेचा वरिष्ठ पदाधिकारी असावा.
क) त्याला कायद्याचे उत्तम ज्ञान असावे.
ड) किंवा अशी व्यक्ती एक किंवा अनेक क्षेत्रातील लोकसेवेचा अनुभव व सेवाभिलेख निर्दोष असलेली तसेच कायद्याचे उत्तम ज्ञान असावी.
न्यायाधिकरण अशी यादी वर्षातून किमान दोन वेळा (१ जानेवारी आणि १ जुलै) सर्वसाधारण माहितीसाठी (काही बदल असल्यास त्यांसह प्रसिध्द करील.

**कलम ७: न्यायाधिकरणाची स्थापना:**
**कलम ७(१):** राज्य शासन या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून (३१.१२.२००७) सहा महिन्याच्या आत, अधिसूचनेद्वारे, प्रत्येक उपविभागासाठी एक किंवा अधिक न्यायाधिकरण स्थापन करेल.

**कलम ७(२):** उपविभागीय अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी या न्यायाधिकरणाचा अध्यक्ष असेल.

**कलम ८: चौकशीची कार्यपध्दती**
**कलम ८(१):** न्यायाधिकरण, कलम ५ खालील अर्जाची चौकशी त्यास योग्य वाटेल अशा संक्षिप्त कार्यपध्दतीने करेल.

**कलम ८(२):** या न्यायाधिकरणास शपथेवर साक्षी पुरावा घेणे, साक्षीदारांना उपस्थित राहणे भाग पाडणे या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम १९५ अन्वये व त्याच्या प्रकरण सव्वीस प्रयोजनार्थ असे न्यायाधिकरण दिवाणी न्यायालय असल्याचे मानले जाईल.

**कलम ९: निर्वाह आदेश**
**कलम ९(१):** स्वत:चा निर्वाह चालविण्यास असमर्थ आई-वडिल अथवा ज्येष्ठ नागरिक यांच्या मुलाने अथवा नातेवाईकाने, त्यांचा निर्वाह चालविण्यास नकार दिला आहे याची खात्री पटल्यानंतर, न्यायाधिकरण अशा आई-वडिल अथवा ज्येष्ठ नागरिकांना मासिक निर्वाह भत्ता देण्यासाठी त्यांच्या मुलांना अथवा नातेवाईकांना आदेश देईल.

**कलम ९(२):** असा मासिक निर्वाह भत्ता दरमहा दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही. (असा मासिक निर्वाह भत्ता ठरवितांना अर्जदाराच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्याची काळजी या मुलभूत गरजा तसेच विरोधी पक्षाचे एकूण उत्पन्नही लक्षात घ्यावे. यासाठी सूत्र: विरुध्द पक्षकाराला सर्व मार्गांनी मिळणारे एकत्रीत उत्पन्न भागिले त्या कुटूंबातील अर्जदारासह एकूण व्यक्ती किंवा कमाल दहा हजार रुपये दरमहा)

**कलम १०: निर्वाहभत्ता कमी-अधिक करणे**
**कलम १०(१):** मासिक निर्वाह भत्ता प्रदान करतांना कलम ९ अन्वये दिलेल्या आदेशासाठी वस्तुस्थितीचा विपर्यास केल्याचे अथवा चुकीचे तथ्य समोर आल्याचे अथवा मासिक निर्वाह अदा करणाऱ्या व्यक्तीच्या परिस्थितीत बदल झाल्याचा पुरावा समोर आल्यास, न्यायाधिकरण कलम ९ अन्वये दिलेल्या आदेशात योग्य ते बदल करु शकेल.

**कलम ११: आदेशाची अंमलबजावणी**
**कलम ११(१):** निर्वाह आदेश आणि त्याबरोबर कार्यवाही खर्चाशी संबंधीत आदेश (असल्यास), यांची प्रत अर्जदारास मोफत देण्यात येईल व पोहोच घेण्यात येईल. विरूध्द पक्षालाही सदरचा आदेश बजावून त्याची पोहोच घेण्यात येईल.

**कलम ११(२):** असा निर्वाह आदेशाचा अंमल व प्रभाव फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण नऊ खाली संमत केलेल्या आदेशाप्रमाणे असेल.

**कलम १२(१):** जर समेट अधिकाऱ्याकडून समझौत्याचा अहवाल ज्ञापनासह प्राप्त झाला असेल तर न्यायाधिकरण दोन्ही पक्षकारांना "फ" नमुन्यात नोटीस बजावेल.

**कलम १३: निर्वाह रक्कम जमा करणे**
ज्यांना उपरोक्त आदेशान्वये रक्कम प्रदान करण्यास भाग पाडण्यात आले आहे त्यांनी आदेशीत रक्कम आदेश जाहिर झाल्यापासून तीस दिवसाच्या आत न्यायाधिकरणाच्या आदेशात दिलेल्या निदेशाप्रमाणे जमा करणे आवश्यक राहील.

**कलम १४: व्याज देणे**
असे न्यायाधिकरण निर्वाह रकमेबरोबर, अर्ज करण्याच्या तारखेपेक्षा आधीची नसेल अशा तारखेपासून पाच टक्क्यापेक्षा कमी आणि आठ टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही अशा दराने सरळव्याज प्रदान करण्याचा आदेश देऊ शकेल.

**कलम १५: अपील न्यायाधिकरण**
**कलम १५(१):** न्यायाधिकरणाच्या निकालाविरुध्द अपील करण्यासाठी एक अपील न्यायाधिकरण असेल.

**कलम १५(२):** जिल्हादंडाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी या अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष असेल.

**कलम १६: अपील**

**कलम १६(१):** न्यायाधिकरणाच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तीला न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या तारखेपासून साठ दिवसाच्या आत अपील न्यायाधिकरणासमोर नमुना "भ" मध्ये अपील दाखल करता येईल. या अपीलाची नोंद अपील न्यायाधिकरणाकडे नमुना "म" मध्ये नोंदविण्यात येईल. आणि अपीलाची पोहोच नमुना "न" मध्ये देण्यात येईल. तसेच अपीलाची कारणे दाखवा नोटीस नमुना "त" मध्ये देण्यात येईल.

**कलम १६(५):** अपील न्यायाधिकरणाचा आदेश अंतिम असेल.

**कलम १६(६):** अपील न्यायाधिकरण अपील मिळाल्यापासून एका महिन्याच्या आत त्यावर निर्णय देईल.

**कलम १७: कायदेशीर प्रतिनिधी**

न्यायाधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांच्या समोरील कार्यवाहीत कोणत्याही पक्षास कायदेशीर प्रतिनिधींद्वारे प्रतिनिधीत्व करता येणार नाही.

**कलम १८: निर्वाह अधिकारी**

**कलम १८(१):** राज्य शासन, जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यास किंवा त्याच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यास निर्वाह अधिकारी म्हणून पदनिर्दिष्ट करेल.

**कलम १८(२):** हा निर्वाह अधिकारी, आई-वडिलांची तशी ईच्छा असल्यास न्यायाधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांच्या समोरील कार्यवाहीत आई-वडिलांचे प्रतिनिधीत्व करेल.

**कलम २३(१):** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाने, एखाद्या व्यक्तीला, तो, त्या ज्येष्ठ नागरिकाला मूलभूत सुविधा पुरवेल किंवा त्याच्या मूलभूत शारीरिक गरजा पुरवेल या शर्तीस अधिन राहून, दान अथवा अन्य प्रकारे आपली मालमत्ता हस्तांतरीत केली असेल आणि त्या व्यक्तीने, त्या ज्येष्ठ नागरिकाला मूलभूत सुविधा पुरविण्यास किंवा मूलभूत शारीरिक गरजा पुरविण्यास नकार दिला असेल किंवा तो त्यासाठी निष्फळ ठरला असेल तर असे झालेले मालमत्तेचे हस्तांतरण लबाडीने किंवा जबरदस्तीने किंवा गैरवाजवी प्रभावाने केले असल्याचे मानण्यात येईल आणि न्यायाधिकरणास असे हस्तांतरण अवैध आहे असे घोषीत करता येईल.

**कलम २३(३):** कोणताही ज्येष्ठ नागरिक, या अधिनियमाद्वारे त्याला असणाऱ्या हक्काची अंमलबजावणी स्वत: करण्यास असमर्थ असेल तर या अधिनियमात उल्लेखीत "संघटना" या संज्ञेत बसणाऱ्या संस्थेतर्फे तो अशा हक्कांची अंमलबजावणी करु शकेल.

**कलम २४: ज्येष्ठ नागरिकांना वाऱ्यावर सोडणे व त्यांचा परित्याग करणे**

ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणारी व त्यांचे संरक्षण करणारी जी कोणतीही व्यक्ती, अशा ज्येष्ठ नागरिकाचा संपूर्णत: परित्याग करण्याच्या उद्देशाने त्याला कोणत्याही ठिकाणी सोडून देईल, ती व्यक्ती कारावासास आणि/किंवा द्रव्यदंडास पात्र असेल.

**कलम २३: दखलपात्र अपराध**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध दखलपात्र व जामीनपात्र असेल.

**कलम २७: दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस रोध**

कोणत्याही दिवाणी न्यायालयास या अधिनियमाची कोणतीही तरतूद ज्यालाही लागू असेल अशा कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत अधिकारिता असणार नाही. या अधिनियमाच्या कोणत्याही गोष्टीबाबतीत दिवाणी न्यायालयाद्वारे कोणताही हुकूमनामा देण्यात येणार नाही.

----------------------------------------- XXX ------------------------------

**न्यायालयीन निर्णय:**

⦿ सावत्र आई ही विधवा असेल अथवा तिचा पती जिवंत असेल आणि तिचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ असेल तर सावत्र आई सुध्दा तिच्या सावत्र मुलाकडून निर्वाहाची मागणी करु शकते. **(किरीटकांत डी. वडोदरीया वि. गुजरात राज्य व इतर, १९९६(४), एस.सी.सी. ४७९;जे.टी. १९९६(६) एस.सी. २४४)**

⦿ बालपणी वडिलांनी त्याची पितृत्वाची जबाबदारी पार पाडली नसली तरीही वडिलांच्या बाजूने निर्वाह आदेश संमत करता येतो. **(पांडूरंग बाबूराव दाभाडे वि. बाबूराव भाऊराव दाभाडे व इतर, १९८०, सी.आर.एल.जे. २५६)**

⦿ दोन मुले असणारे आई-वडिलांसाठी दोन मुलांपैकी कोणत्याही मुलाकडून निर्वाह भत्त्याची मागणी करु शकतात. **(महेंद्रकुमार रामराव गायकवाड वि. गुलाबभाई व इतर, २००१, सी.आर.एल.जे. २१११)**

⦿ आई-वडिलांसाठी निर्वाह आदेश मंजूर करण्यापूर्वी आई-वडिलांनी मुलाच्या बालपणात त्यांची मातृत्व-पितृत्व जबाबदारी पार पाडली असणे आवश्यक आहे. **(महेंद्रकुमार रामराव गायकवाड वि. गुलाबभाई व इतर, २००१, सी.आर.एल.जे. २१११)**

⦿ निर्वाहाची मागणी ज्या व्यक्तीने केली आहे अशी व्यक्ती जेथे राहते त्या ठिकाणच्या न्यायाधिकरणाकडे दाखल करता येईल. **(विजयकुमार प्रसाद वि. बिहार राज्य व इतर, २००४, सी.आर.एल.जे. २०४७)**

----------------------------------------- XXX ------------------------------

# अर्जाचे प्रारुप नमुने

**१. नमुना "अ": निर्वाहासाठी अर्ज**

**नमुना "अ"**
**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम ५ (१) अन्वये निर्वाहासाठी अर्ज**

**------------------ न्यायाधिकरण यांचे समोर**

**अर्ज क्रमांकः /२०१५** **दिनांकः**

अर्जदाराचे नावः
(एकापेक्षा जास्त अर्जदार असतील तर सर्वांचा तपशील द्यावा)

वयः लिंगः राष्ट्रीयत्वः

संपूर्ण पत्ताः

दूरध्वनी/मोबाईल क्र.:

अर्जदाराने अंतिमतः धारण केलेल्या
नोकरी/व्यवसायाचा तपशीलः

उपरोक्त नोकरी/व्यवसायातून
मिळणारे दरमहा उत्पन्नः

अर्जदाराकडे असणाऱ्या संपत्तीचे विवरण (तपशील द्यावा):

अर्जदारास आज रोजी सर्व प्रकारे मिळणारे
अंदाजे उत्पन्न (तपशील द्यावा):

अर्जदाराने आपली कोणतीही मालमत्ता
हस्तांतरीत/दान/बक्षीस केली असल्यास त्याचा तपशीलः

अर्जदारास असलेल्या शारीरिक व्याधी (तपशील द्यावा):

गैरअर्जदार/विरुध्द पक्षाचे नावः
(एकापेक्षा जास्त गैरअर्जदार असतील तर सर्वांचा तपशील द्यावा)

वयः लिंगः राष्ट्रीयत्वः

संपूर्ण पत्ताः

दूरध्वनी/मोबाईल क्र.:

गैरअर्जदार/विरुध्द पक्षाचे आणि अर्जदाराचे नातेः

गैरअर्जदार/विरुध्द पक्षाचा व्यवसाय/नोकरीः

गैरअर्जदार/विरुध्द पक्षाचे मासिक उत्पन्न (अंदाजे):

गैरअर्जदार/विरुध्द पक्षावर अवलंबून असणाऱ्या एकूण
व्यक्तींची संख्या व नातेः (तपशील द्यावा)

अर्जाचे कारण व मागणीः

१. अर्जदार हे वयोवृध्द असून त्यांच्याकडे आजमितीस अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय शुश्रुषा (देखभाल) व उपचार यांसाठी पुरेसे साधन नाही.

२. गैरअर्जदार/विरुध्द पक्ष अर्जदाराचे ------------- (पुत्र, कन्या, नातू, नात, इतर) या नात्याने नातेवाईक असून कायदेशीर वारस आहेत
तथा १) अर्जदाराच्या मिळकतीचा उपभोग घेत आहेत.
किंवा
२) अर्जदाराच्या मिळकतीचा उपभोग घेणारे उत्तराधिकारी आहेत. म्हणून अर्जदाराला त्यांचेकडून निर्वाहासाठी रक्कम मिळण्याचा हक्क आहे.
किंवा
३) गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या मिळकतीची विक्री केली आहे/स्वतःच्या नावावर करुन घेतल्या आणि अर्जदाराचा परित्याग केलेला आहे.
किंवा
४) गैरअर्जदाराकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असून अर्जदाराचा निर्वाह करण्याची ऐपत आहे व अर्जदारास निर्वाह खर्च देण्याची गैरअर्जदाराची जबाबदारी आहे.
किंवा

इतर योग्य ते कारण

अर्जदाराला, गैरअर्जदाराकडून/सार्वत्रिकपणे दरमहा रुपये दहा हजार (एकापेक्षा अधिक गैरअर्जदार असतील तर 'सार्वत्रिकपणे' हा शब्द वापरावा.) इतकी रक्कम अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय शुश्रुषा (देखभाल) व उपचार यांसाठी मिळणेबाबत आदेश देण्यात यावा ही विनंती.

दिनांकः अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठा
ठिकाणः

**प्रतिज्ञालेख**

मी/आम्ही, उपरोक्त अर्जदार याव्दारे प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, मला/आम्हाला माझ्या/आमच्या उत्पन्नातुन / बचतीतुन / मालमत्तेतुन स्वतःचा चरितार्थ चालविणे शक्य होत नाही. गैरअर्जदार/विरुध्द पक्ष यांचे कडून आम्हाला निर्वाह खर्च मिळणे आवश्यक असून तो आमचा हक्क आहे.
मी/आम्ही दाखल केलेल्या या प्रकरणाशिवाय निर्वाह खर्च मिळणेसाठी इतर कोणत्याही न्यायाधिकरणाकडे किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम १२५ अन्वये कोणत्याही न्यायालयात आम्ही प्रकरण दाखल केलेले नाही किंवा तसे प्रकरण अन्य कोठेही प्रलंबित नाही.

दिनांकः अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठा
ठिकाणः

**२. नमुना "ब": न्यायाधिकरणाने अर्जाची नोंद ठेवण्याचा नमुना.**

**नमुना "ब"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम ४ (२) (क) अन्वये अर्जाची नोंद**

**१.** अर्ज क्रमांक:

**२.** अर्जदाराचे नाव:
वय:
लिंग:
संपूर्ण पत्ता:

दूरध्वनी/मोबाईल क्र.:

**३.** गैरअर्जदाराचे नाव:
वय:
लिंग:
संपूर्ण पत्ता:

दूरध्वनी/मोबाईल क्र.:

**४.** नमुना "क" मधील कारणे दाखवा नोटीसीचा दिनांक:

**५.** सुनावणीचे दिनांक:

**६.** आदेश निर्गमित करण्यात आल्याचा दिनांक:

**७.** आदेशाचे स्वरुप: अर्ज मंजुर अर्ज अंशतः मंजुर अर्ज फेटाळण्यात आला

**३. नमुना "क": कारणे दाखवा नोटीसीचा नमुना.**

**नमुना "क"**

**ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण, ------------.**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम ५ (३) अन्वये नोटीस**

**पोहोच देय डाकेने**

निर्वाह अर्ज क्रमांक: दिनांक:

श्री/श्रीमती:
पत्ता: **अर्जदार**

**विरुध्द**

श्री/श्रीमती:
पत्ता: **गैरअर्जदार**

------ येथील न्यायाधिकरणामार्फत उपरोक्त गैरअर्जदारांना नोटीस देण्यात येते की,
अर्जदार श्री. -------------------- यांनी आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम ५ (१) अन्वये निर्वाहासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

त्या अनुषंगाने, अर्जदारास त्याच्या निर्वाहासाठी दरमहा रुपये दहा हजार इतकी रक्कम का मंजुर करू नये? तसेच सदर प्रकरणात आपला समावेश का करू नये? याबाबत तुमची बाजू मांडण्यासाठी आपण व्यक्तीशः, लेखी उत्तरासह या न्यायाधिकरणासमोर दिनांक / / रोजी ठिक : वाजता हजर रहावे.

सुनावणीच्या दिवशी व वेळी आपण गैरहजर राहिल्यास, आपल्या अनुपस्थितीत एकतर्फी निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष, पदस्थ अधिकारी
ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण, ------------.

**४. नमुना "ड": समेटकर्ता अधिकारी यांना संदर्भ करण्याचा नमुना.**

**नमुना "ड"**

**ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण, ------------.**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० च्या कलम १० (२) अन्वये**

**नोंदणीकृत डाकेने**

दिनांक:

प्रती,
श्री/श्रीमती:
समेटकर्ता अधिकारी,
पत्ता:

विषय: समझोता घडवून आणणे बाबत.

संदर्भ: श्री.------ यांचा निर्वाह अर्ज क्र. ---------, दिनांक--------------.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की,
संदर्भिय प्रकरणात अर्जदार व गैरअर्जदार समेटकर्ता अधिकाऱ्यामार्फत समझोता करण्यास तयार आहेत. सोबत संबंधित प्रकरणाची कागदपत्रे संलग्न आहेत.

दोन्ही पक्षकारांना मान्य असेल असा समझोता करार आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० च्या नमुना "इ" मध्ये करुन तो हे पत्र प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात यावा अशी विनंती आहे.

अध्यक्ष, पदस्थ अधिकारी
ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण, ------------.

**५. नमुना "इ": समझोता कराराचा नमुना.**

**नमुना "इ"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० च्या कलम ११ (२) अन्वये**

निर्वाह अर्ज क्रमांक: दिनांक:

श्री/श्रीमती:
पत्ता: **अर्जदार**

**विरुध्द**

श्री/श्रीमती:
पत्ता: **गैरअर्जदार**

आम्ही, खाली सही करणार, उपरोक्त प्रकरणात गैरअर्जदार असून, याद्वारे मा. समेट अधिकारी यांचे समोर असे कबुल करून लिहून देतो की, आम्ही या प्रकरणातील अर्जदार यांस रक्कम रूपये -------------/- (अक्षरी रक्कम रुपये ) दरमहा देण्यास तयार आहोत.

गैरअर्जदाराची स्वाक्षरी:
अर्जदाराची स्वाक्षरी: समक्ष

समेट अधिकारी यांची स्वाक्षरी

दिनांक:

**६. नमुना "प": समेटकर्ता अधिकारी यांचा अहवाल.**

**नमुना "प"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० च्या कलम ११ (३) अन्वये**

प्रति,
मा. ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण, ------------. दिनांक:
पत्ता:

विषय: समझोता घडवून आणणे बाबत.

संदर्भ: १. श्री.------ यांचा निर्वाह अर्ज क्र. ---------, दिनांक--------------.
२. आपलेकडील सम विषयाचे पत्र, दिनांक:

उपरोक्त विषयाबाबत आपणाकडून संदर्भिय प्रकरणात अर्जदार व गैरअर्जदार समेटकर्ता अधिकाऱ्यामार्फत समझोता करण्यास तयार आहेत त्याप्रमाणे समझोता करार करून देणेबाबत कळविण्यात आले होते.

मी दोन्ही पक्षकारांना मान्य असलेला समझोता घडवून आणला असून तो आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० च्या नमुना "इ" मध्ये करुन सोबत मुदतीत सादर केला आहे. सोबत संबंधित प्रकरणाची कागदपत्रे संलग्न आहेत.

किंवा

मी दोन्ही पक्षकारांना मान्य असलेला समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला परंतू खालील मुद्यांच्या बाबतीत समझोता होऊ शकला नाही.
१.
२.
३.
सबब सदरचे मुळ प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे परत पाठवित आहे. सोबत संबंधित प्रकरणाची कागदपत्रे संलग्न आहेत.

समेटकर्ता अधिकारी
नाव:

**७. नमुना "फ": समझोता करार कायम करण्याचा नमुना.**

**नमुना "फ"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० च्या कलम १२ (१) अन्वये**

निर्वाह अर्ज क्रमांकः दिनांकः

श्री/श्रीमतीः
पत्ताः **अर्जदार**

**विरुध्द**

श्री/श्रीमतीः
पत्ताः **गैरअर्जदार**

उपरोक्त प्रकरणाच्या संदर्भाने दोन्ही पक्षात समेटकर्ता अधिकारी यांचे समक्ष दिनांक -------- रोजी समझोता करार करण्यात आला आहे. त्यानुसार अर्जदाराला देण्यात येणारी निर्वाह रक्कम कायम करण्यासाठी आपण व्यक्तीशः या न्यायाधिकरणासमोर दिनांक / / रोजी ठिक : वाजता हजर रहावे.

अध्यक्ष, पदस्थ अधिकारी
ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण, ------------.

दिनांकः

८. नमुना "भ":  अपीलाचा नमुना.

**नमुना "भ"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम १६ (१) अन्वये अपील**

**------------------ ज्येष्ठ नागरिक चरितार्थ अपिलीय न्यायाधिकरण यांचे समोर**

निर्वाह अपील क्रमांक: दिनांक:

श्री/श्रीमती:
पत्ता: **अपिलार्थी**

**विरुध्द**

श्री/श्रीमती:
पत्ता: **प्रतिवादी**

------ येथील अपील न्यायाधिकरणासमोर अपिलार्थी सादर करतो की,
१. अपिलार्थी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये निर्वाहासाठी मे. -------- न्यायाधिकरणासमोर दिनांक / / रोजी अर्ज दाखल केला होता. त्याचा निर्वाह अर्ज क्रमांक ------- असा होता. परंतू दिनांक / / रोजीच्या निर्णयानुसार मे. -------- न्यायाधिकरणाने सदरचा अर्ज फेटाळून लावला आहे. या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी सदरचे अपील दाखल केले आहे.

२. मे. -------- न्यायाधिकरणाचा सदर निर्णय हा चुकीचा आहे.

३. मे. -------- न्यायाधिकरणाने, अपिलार्थी यांनी सादर केलेल्या पुराव्याचा चुकीचा अर्थ लावला आहे. त्यामुळे मे. -------- न्यायाधिकरणाने दिलेला दिनांक / / चा आदेश रद्द करणे कायद्याने आवश्यक आहे.

४. अपिलार्थी यांचेकडे त्यांची विनंती शाबित करण्यासाठी अनेक मुद्दे व पुरावे आहेत.

५. अपिलार्थी यांनी सदरचे अपील मुदतीत दाखल केले आहे.

६. अपिलार्थी यांनी वाद विषयाबाबत या न्यायाधिकरणाशिवाय अन्यत्र कोठेही अपील दाखल केलेले नाही.

७. मे. -------- न्यायाधिकरणाने दिनांक / / रोजी दिलेला निर्णय सदर कायद्याचे व सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करणारा नसल्याने तो निर्णय रद्द होणे अत्यावश्यक आहे.

सोबत मे. -------- न्यायाधिकरणाने दिलेल्या दिनांक / / निकालाची प्रत जोडलेली आहे.

अपिलार्थींची विनंती की,

१. अपील मान्य करण्यात यावे.
२. मे. -------- न्यायाधिकरणाचा दिनांक / / चा आदेश रद्द करण्यात यावा.
३. जरुर तर अधिक पुरावे दाखल करण्याची मुभा देण्यात यावी.
४. अपिलार्थींच्या हिताचे व न्यायाचे इतर हुकूम व्हावेत.

दिनांक: अपिलार्थींची स्वाक्षरी
ठिकाण:

**९. नमुना "म": अपील न्यायाधिकरणाने अपीलाची नोंद ठेवण्याचा नमुना.**

**नमुना "म"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम १६ अन्वये अपीलाची नोंद**

१. अपील क्रमांक:

२. अपिलार्थींचे नाव:
वय:
लिंग:
संपूर्ण पत्ता:

दूरध्वनी/मोबाईल क्र.:

३. प्रतिवादीचे नाव:
वय:
लिंग:
संपूर्ण पत्ता:

दूरध्वनी/मोबाईल क्र.:

४. आक्षेपित आदेशाचा तपशील:

५. कारणे दाखवा नोटीसीचा दिनांक:

६. सुनावणीचे दिनांक:

७. आदेश निर्गमित करण्यात आल्याचा दिनांक:

८. आदेशाचे स्वरुप: अर्ज मंजुर अर्ज अंशत: मंजुर अर्ज फेटाळण्यात आला

## १०. नमुना "न": अपिलाची पाहोच नमुना.

**नमुना "न"**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम १६ अन्वये**

निर्वाह अपील क्रमांक: दिनांक:

श्री/श्रीमती:
पत्ता: **अपिलार्थी**

**विरुध्द**

श्री/श्रीमती:
पत्ता: **प्रतिवादी**

विषय: अपील क्रमांक -------- दिनांक ------

-------- येथील अपील न्यायाधिकरण येथे अपिलार्थी यांनी अपील दाखल केले आहे.
सदर अपीलाचा नोदणी क्रमांक ---------/------- असा आहे.

अध्यक्ष, पदस्थ अधिकारी,

ज्येष्ठ नागरिक चरितार्थ अपिलीय न्यायाधिकरण

**११. नमुना "त": कारणे दाखवा नोटीसीचा नमुना.**

**नमुना "त"**

**ज्येष्ठ नागरिक चरितार्थ अपिलीय न्यायाधिकरण, ------------.**

**आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम १६ (२) अन्वये नोटीस**

**पोहोच देय डाकेने**

अपील क्रमांक: निर्वाह अर्ज क्रमांक:
दिनांक:

श्री/श्रीमती:
पत्ता: **अपिलार्थी**

**विरुध्द**

श्री/श्रीमती:
पत्ता: **प्रतिवादी**

------ येथील अपिलीय न्यायाधिकरणामार्फत उपरोक्त प्रतिवादी यांना नोटीस देण्यात येते की,
अपिलार्थी श्री. -------------------- यांनी आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलम १६ अन्वये ---------- न्यायाधिकरणाच्या दिनांक / / रोजीच्या आदेशाविरूध्द अपील दाखल केले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

त्या अनुषंगाने तुमची बाजू मांडण्यासाठी आपण व्यक्तीशः, लेखी उत्तरासह या अपिलीय न्यायाधिकरणासमोर दिनांक / / रोजी ठिक : वाजता हजर रहावे.

सुनावणीच्या दिवशी व वेळी आपण गैरहजर राहिल्यास, आपल्या अनुपस्थितीत एकतर्फी निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष, पदस्थ अधिकारी
ज्येष्ठ नागरिक चरितार्थ अपिलीय न्यायाधिकरण, ------------.